प्रकरण – चार

# संशोधन पद्धती

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# प्रकरण - चार

## संशोधन पध्दती


४.१ प्रस्तावना

४.२ सर्वेक्षण पध्दतीचे महत्व

४.३ सर्वेक्षणाचे विविध प्रकार

४.४ विद्यालय सर्वेक्षणाचे स्वरूप

४.५ विद्यालय सर्वेक्षणाचे उद्देश

४.६ विद्यालय सर्वेक्षणाची तंत्रे

४.७ संशोधन पध्दती

४.८ विद्यार्थी प्रश्नावली

४.९ अध्यापक प्रश्नावली

४.१० पालक प्रश्नावली

४.११ समारोप

# प्रकरण - चौथे

## संशोधन पध्दती

४.१ प्रस्तावना :-

या अगोदरच्या प्रकरण तीन मध्ये समाजजीवनशास्त्र, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक, परीक्षा पध्दती आणि मार्गदर्शक यांचा साकल्याने परामर्ष घेतला आहे. प्रस्तुत प्रकरण चार मध्ये संशोधनासाठी वापरलेल्या संशोधन पध्दतीचा विचार विस्तृत मांडण्यासाठी सर्वेक्षण पध्दती, तिचे महत्व, सर्वेक्षणाचे विविध प्रकार, विद्यालय सर्वेक्षणाचे स्वरुप, विद्यालय सर्वेक्षणाचे उद्देश व तंत्रे, विद्यार्थी प्रश्नावली, अध्यापक प्रश्नावली आणि पालक प्रश्नावली यासर्व बाबींची सविस्तर माहिती दिली आहे. सदर प्रकरणातील माहितीच्या आधारे संशोधन पध्दतीची कल्पना साकल्याने येण्यास मदत होणार आहे.

४.२ सर्वेक्षण पध्दतीचे महत्व :-

शैक्षणिक संशोधनाची महत्वपूर्ण पध्दती म्हणजे सर्वेक्षण पध्दती होय. सर्वेक्षण [ Survey ], आदर्शमूलक सर्वेक्षण [ Normative Survey ] स्तर [ Status ] आणि वर्णनात्मक पध्दती [ Descriptive Method ] अशा विविध नांवानी ती प्रचलित आहे. अभ्यास वस्तुची वर्तमानस्थिती कशी आहे हे पाहण्याकरिता वापरली जाणारी ती पध्दती आहे.

विशिष्ट बाबतीत असलेली सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या संशोधन पध्दतीला सर्वेक्षण पध्दती असे म्हणतात.

या प्रकारचे संशोधन सद्यः स्थितीचे वर्णन करते आणि सद्यःस्थिती स्पष्ट करते. वर्तमानात असलेले संबंध, प्रचलित परिपाठ, दिसून येणाऱ्या निष्ठा, दृष्टीकोन आणि अभिवृत्ती, सुरु असलेल्या प्रक्रिया, जाणवणारे परिणाम, विकसित होत असलेले विचारप्रवाह यांच्याशी ते संबंधित असते.

सर्वेक्षणातून खालील तीन प्रकारची माहिती संकलित केली जाते.

[१] वर्तमान स्थिती

[२] अपेक्षित स्थिती

[३] आवश्यक साधनांचा बोध

सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते, कोणकोणत्या बाबी कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत याची माहिती कळते, समस्या निराकरणाकरिता कोणती स्थिती अपेक्षित आहे हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते व ही अपेक्षित स्थिती प्राप्त करुन समस्येची उकल करण्याकरिता कोणत्या साधनांची व प्रयत्नांची आवश्यकता आहे हे त्यामुळे कळते.

४.३ <u>सर्वेक्षणाचे विविध प्रकार</u> :-

अभ्यासाचे उद्दिष्ट्य, क्षेत्र, साधनतंत्र, विषय इत्यादीनुसार सर्वेक्षणाचे विविध प्रकार पडतात.

[१] विद्यालय सर्वेक्षण (School Survey)

[२] सर्वेक्षण परीक्षण (Survey Testing)

[३] सर्वेक्षण वारंवारिता (Documentary Frequency Studies)

[४] सर्वेक्षण मूल्यांकन (Survey Appraisal)

[५] पाठपुरावा अभ्यास (Follow up Studies)

[६] न्यादर्श सर्वेक्षण (Sample Survey)

४.४ विद्यालय सर्वेक्षण स्वरूप :-

विद्यालय सर्वेक्षणात विद्यालयाशी संबंधित असलेल्या विविध बाबींची सद्यःस्थिती , त्यातील आवश्यक बदल आणि त्याकरिता इष्ट असलेले उपाय यांचा सर्वेक्षणात्मक संशोधनाचा अंतर्भाव होतो. विद्यालयाशी संबंधित असलेले सर्वेक्षण विविध प्रकारचे असते. गांव, शहर, जिल्हा, राष्ट्र, ग्रामीण किंवा नागर विभाग अशा भिन्न भौगोलिक क्षेत्राशी ते संबंधित असते. शिक्षणाच्या भिन्न स्तरानुसार पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक किंवा महाविद्यालयीन स्तरावर ते राहू शकते. ज्या शैक्षणिक कार्यानुसार ते केले जाते त्यानुसारही ते वास्तु, अभ्यास पध्दती, प्रशासन प्रयोगशाळा, अर्थव्यवस्था, विद्यार्थ्यांची प्रगती, त्यांच्या अभिवृत्ती, बौध्दीक क्षमता, आवडी निवडी इत्यादी स्वरूपाचे राहू शकते. सामान्यतः विद्यालय सर्वेक्षणात स्तर, क्षेत्र आणि कार्य या तिन्ही बाबी एकत्रित विचारात घेतल्या जातात. कोणत्या स्तरावर, कोणत्या क्षेत्रात, कशाकरिता सर्वेक्षण करावयाचे याचा विचार त्यात असतो. कधी कधी अनेक कार्यांचा एकत्रित विचार करण्याकरिता व्यापक स्वरूपाचे सर्वेक्षण केले जाते.

४.५ विद्यालय सर्वेक्षणाचे उद्देश :-

विद्यालय सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश शैक्षणिक प्रगती हा आहे. विद्यालयाशी निगडीत असलेल्या विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापक, अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन, शालेय भवन, प्रयोगशाळा, पाठ्यपुस्तके

परीक्षा, विद्यार्थ्यांची प्रगती, त्यांची बौध्दीक क्षमता, त्यांच्या आवडी निवडी, अर्थव्यवस्था इत्यादी बाबींत विद्यालयाची स्थिती कशी आहे, इतर विद्यालयाच्या तुलनेत त्याचे स्थान कोणते, त्याच्या विकासाला कितपत वाव आहे. असलेल्या अडचणी कोणत्या व त्या दूर करण्याचे मार्ग कोणते इत्यादी प्रश्नांची उत्तरे मिळविण्याकरिता विद्यालय सर्वेक्षण केले जाते.

४.६ विद्यालय सर्वेक्षणाची तंत्रे :-

विद्यालय सर्वेक्षणात प्रश्नावली सारख्या तंत्राचा उपयोग केला जातो. त्यात विविध व्यक्तींच्या प्रामाणिक मतांची व विचारांची दखल घेतली जात असल्याने त्याला एक वेगळ्या प्रकारचे महत्व प्राप्त होते. विद्यालयाशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या अनुभवांचा आणि सूचनांचा प्रत्यक्ष लाभ संशोधन कार्याला मिळतो. मुलाखती आणि प्रश्नावली यातून संबंधित व्यक्ती आपले मनोगत त्याच्याजवळ बोलून किंवा लिहून व्यक्त करीत असते आणि त्यामुळे अभ्यासकाला वस्तुस्थितीचा परिचय सहज होतो.

४.७ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दती वापरली आहे. प्रस्तुत संशोधन विषयाच्या समस्याच्या संदर्भात सद्यःस्थिती कोणती आहे हे जाणून घेण्यासाठी ही संशोधन पध्दती उपयुक्त ठरली आहे. संशोधनासाठी आवश्यक साधन सामुग्रीच्या संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखत, चर्चा व निरीक्षण या शैक्षणिक संशोधन साधनांचा वापर केला आहे.

सर्वेक्षण पध्दतीच्या आधारे मिळालेल्या सामुग्रीचे संकलन , वर्णन, स्पष्टीकरण व मूल्यांकन केले असून चांगल्या बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत शोध प्रबंधाचे दोन भाग पडतात.

[१] इतिहास विषयाच्या अध्ययन-अध्यापनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या वापराचा सर्वेक्षण करुन आढावा घेणे.

[२] संकलित झालेल्या माहितीचे विश्लेषण विवरण करुन निष्कर्ष व शिफारशी करणे.

पहिल्या भागाचे पुन्हा तीन उपविभागात वर्गीकरण केले आहे.

पहिल्या उपविभागात इतिहास अध्ययनातील पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या उपयोगाचा "विद्यार्थी प्रश्नावली" व्दारा आढावा घेतला आहे.

दुसऱ्या उपविभागात इतिहास अध्यापनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या उपयोगांचा"अध्यापक प्रश्नावली" व्दारा आढावा घेतला आहे.

तिसऱ्या उपविभागात पाठ्यपुस्तक आणि मार्गदर्शक यांचा इतिहास अध्यापन अध्ययनातील उपयोगाचा पालकांचा दृष्टीकोन "पालक प्रश्नावली"व्दारा समजून घेतला आहे.

विद्यार्थी प्रश्नावली, अध्यापक प्रश्नावली, पालक प्रश्नावली अनुक्रमे परिशिष्ट "अ" "ब"कमध्ये दिल्या आहेत. या तिन्ही प्रश्नावलीतील काही प्रश्न बंदिस्त स्वरुपाचे, काही मुक्त आणि बरेचसे प्रश्न संमिश्र स्वरुपाचे आहेत.

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी संशोधकाने संशोधनाचे साधन म्हणून विद्यार्थी प्रश्नावली, अध्यापक प्रश्नावली, पालक प्रश्नावली तयार करण्यासाठी कराड नगरपरिषदेच्या हद्दीतील सात माध्यमिक

विद्यालयातील इयत्ता दहावीचे विद्यार्थी, त्यांना इतिहास विषय शिकविणारे अध्यापक व त्यांचे पालक असे मर्यादित क्षेत्र वापरलेले आहे. प्रस्तुत संशोधकाने प्रश्नावली तयार करण्यासाठी स्वतःचे ज्ञान व अनुभव, उपयुक्त साहित्याचा अभ्यास, सहकारी मित्र व परिचितांशी विचारविमर्श, तसेच या क्षेत्रातील तज्ञांच्या शोधनात्मक अनिर्बंधीत मुलाखती घेऊन आपल्या संशोधनासाठी प्रश्नावलीस उपयुक्त अशी माहिती मिळविली. प्रश्नाचे स्वरूप, उत्तरातील विविधता, संशोधनातील गोंधळात पाडणाऱ्या बाबी, अभ्यास वस्तु संबंधी नवीन दिशा इत्यादी बद्दल उपयुक्त माहिती पथदर्शी अभ्यासाने प्राप्त करून घेतली. अशा प्रकारे प्रश्नावली निर्दोष करण्याच्या दृष्टीने सहकाऱ्यांशी चर्चा, तज्ञांच्या मुलाखती व मार्गदर्शक अध्ययन यातून प्रश्नावलीचा कच्चा आराखडा तयार केला.

काळजीपूर्वक तयार केलेल्या प्रश्नावलीचा प्राथमिक मसुदा पूर्णपणे निर्दोष असेलच असे सांगता येत नाही. म्हणून त्यातून सदोष प्रश्न गाळून योग्य प्रश्नांची निवड अंतीम मसुद्यासाठी होण्याच्या दृष्टीने प्रश्नावलीची पूर्वचाचणी घेतली. पूर्व चाचणी ही अंतीम प्रयोगाची रंगीत तालीम समजूनच घेतली पूर्वचाचणीसाठी एक नमुना गट प्रातिनिधीक स्वरूपाचा निवडून त्याला पूर्वचाचणी दिली. पूर्व चाचणीतून आलेल्या उत्तराच्या विश्लेषणाव्दारे सदोष प्रश्न प्रश्नावलीतून काढून टाकले. पूर्व चाचणीने प्रश्नावलीतील उणीवा दूर झाल्या. सदोष प्रश्न समजले. मुद्रणचुका व उत्तरासाठी जागेचा अभाव असल्याचेही कळले. प्रतिवेदकांच्या शंका, गैरसमज, परिभाषा, वर्गीकरणातील अस्पष्टता, अनपेक्षीत उत्तरे इत्यादी गोष्टी विषयीची माहिती मिळाली. यासर्व त्रुटी दुरुस्त केल्यावर प्रश्नावलीचा अंतीम मसुदा तयार केला.

हा प्रश्नावलीचा अंतीम मसुदा पूर्णपणे निर्दोष, सप्रमाण व विश्वसार्ह असेलच असे नाही. म्हणून विद्यार्थी प्रश्नावलीची विश्वसार्हता सिध्द करण्यासाठी एकाच वेळी पांच विद्यार्थ्यांना प्रश्नावली दिली. त्यानी दिलेल्या उत्तराच्या प्रतिसादाची नोंद ठेवून चार दिवसाच्या अंतराने तीच प्रश्नावली त्याच पांच विद्यार्थ्यांना दिली. याखेळीही त्यानी दिलेल्या उत्तराच्या प्रतिसादाची नोंद केली, प्रारंभी प्रश्नावलीला मिळालेल्या उत्तराच्या प्रतिसादात आणि नंतर चार दिवसानी त्याच विद्यार्थ्यांनी त्याच प्रश्नावलीला दिलेल्या उत्तराच्या प्रतिसादात फारच कमी तफावत आढळून आली, म्हणून ही विद्यार्थी प्रश्नावली विश्वसार्ह आहे हे मान्य केले.

विद्यार्थी प्रश्नावलीची सप्रमाणता सिध्द करण्यासाठी तीच प्रश्नावली दुसऱ्या पांच विद्यार्थ्यांना एकाच वेळी दिली. त्यानी दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांच्या प्रतिसादात कमी तफावत आढळून आली. म्हणून ही प्रश्नावली सप्रमाण असल्याचे मान्य केले. अशा प्रकारे विद्यार्थी प्रश्नावलीची विश्वसार्हता व सप्रमाणता सिध्द करून ती प्रश्नावली प्रस्तुत संशोधनासाठी प्रत्यक्ष वापरली गेली.

अध्यापक प्रश्नावली व पालक प्रश्नावलीचीही विश्वसार्हता व सप्रमाणता वरील पध्दतीने सिध्द करून त्या प्रश्नावल्या प्रस्तुत संशोधनासाठी प्रत्यक्ष वापरल्या गेल्या.

प्रस्तुत संशोधन समस्येच्या अभ्यासासाठी कराड नगरपालिकेच्या हद्दीतील सर्वच सात माध्यमिक शाळांची निवड केली आहे. [माध्यमिक-शाळांची यादी प्रकरण एक मध्ये दिलेली आहे. ] या सात माध्यमिक शाळापैकी कन्या शाळा व विठामाता विद्यालय या दोन शाळा फक्त मुलींच्यासाठी आहेत. टिळक हायस्कूल व श्री. शिवाजी विद्यालय या

दोन शाळा फक्त मुलांच्यासाठी आहेत. तर यशवंत हायस्कूल, श्री. संततुकाराम हायस्कूल व महाराष्ट्र हायस्कूल या तीन शाळा मुला मुलींच्या सहशिक्षणाच्या आहेत. या सात माध्यमिक शाळामध्ये सन १९८९-९० या वर्षात इयत्ता १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींची एकूण संख्या १००३ इतकी आहे. संपूर्ण विद्यार्थी जनसंख्येचे प्रतिनिधीत्व करु शकणाऱ्या लहान गटाच्या अभ्यासावरुन संपूर्ण विद्यार्थी जनसंख्येच्या प्रवृत्ती बाबत पूर्वानुमान काढणे अधिक श्रेयस्कर असते म्हणून प्रस्तुत संशोधकाने संभाव्य पध्दतीच्या सुगम यादृच्छिक न्यादर्शनाने एकूण १००३ विद्यार्थी जनसंख्येच्या १० टक्के म्हणजे १०० विद्यार्थी विद्यार्थ्यांनींची निवड केली. १०० विद्यार्थी विद्यार्थ्यांनी हा प्रस्तुत संशोधनाचा न्यादर्शन संच आहे. या निवडलेल्या न्यादर्शन संचाला प्रत्यक्ष प्रश्नावली देवून समस्येबाबतचा आढावा घेतला. प्रश्नावली भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी परिशिष्ट "इ" मध्ये देण्यात आलेली आहे.

४.८ विद्यार्थी प्रश्नावली :-

विद्यार्थ्यांना देण्यात आलेली प्रश्नावली परिशिष्ट "अ" मध्ये दिलेली आहे. या प्रश्नावलीत एकूण १५ प्रश्न आहेत. त्यातील काही प्रश्न बंदिस्त स्वरुपाचे, काही मुक्त स्वरुपाचे आणि बरेचसे संमिश्र स्वरुपाचे आहेत. विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणी क्रमांक ४.१ मध्ये केले आहे.

## सारणी क्रमांक ४.१

विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण :-

| अ.नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरुप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १. | १ ते ६ | बंदिस्त | विद्यार्थ्यांकडे सर्व क्रमिक पुस्तके, त्याबरोबर मार्गदर्शिका आहेत किंवा कसे, शिक्षकांनी व पालकांनी मार्गदर्शक वापरण्यास सूचना, प्रोत्साहन दिले किंवा कसे, पाठ्यपुस्तकाशिवाय पास होणे शक्य आहे काय, मार्गदर्शक अभ्यासाला पुरेसा आहे काय याविषयी अचूक माहिती जाणून घेणे. |
| २. | ७ | संमिश्र | अभ्यासाठी पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यापैकी कोणते जास्त वापरले जाते त्याची कारणे जाणून घेणे. |
| ३. | ८ | मुक्त | पाठ्यपुस्तकातून अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी समजून घेणे. |
| ४. | ९, १० | संमिश्र | मार्गदर्शकाच्या जास्त वापरा - मागील कारणांचा मागोवा घेणे, पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यातील नेमका फरक जाणून घेणे. |
| ५. | ११, १२ | मुक्त | परीक्षा पध्दतीचे स्वरुप व मार्गदर्शक यांचा संबंध जाणून घेणे तसेच पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा, दोष जाणून घेणे. |

| अ. नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| ६. | १३ | संमिश्र | पाठ्यपुस्तकाचे स्वरूप मार्गदर्शिका सारखे असावे काय याविषयीची मते अजमावणे. |
| ७. | १४, १५ | मुक्त | पाठ्यपुस्तक लेखनातील बदल, पाठ्यपुस्तक अधिक वापरण्या बाबतचे उपक्रम व सूचना जाणून घेणे. |

ही "विद्यार्थी प्रश्नावली" भरून घेण्याच्या दृष्टीने संशोधकाने प्रथम शाळेत जावून शाळेच्या मुख्याध्यापकांची भेट घेतली. त्यांच्या संमतीनुसार इतिहास विषयाच्या अध्यापकांची भेट घेतली व विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्याची वेळ ठरवून घेतली. प्रश्नावली दिल्यानंतर ती कशी भरून द्यायची याबाबत सूचना दिल्या. संशोधका समोरच विद्यार्थ्यांनी प्रश्नावली भरून दिली. प्रश्नावली भरून देणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे परिशिष्ट "ड" मध्ये दिलेली आहेत.

वरील प्रश्नावलीव्दारा विद्यार्थ्यांकडून गोळा केलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी संशोधकाने शाळेतील विद्यार्थ्यांशी गटवार चर्चा केली.

४.९ <u>अध्यापक प्रश्नावली</u> :-

माध्यमिक स्तरावर इयत्ता दहावीच्या इतिहास विषयाच्या अध्यापनात पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या वापराचा आढावा घेण्यासाठी "अध्यापक प्रश्नावली" तयार करण्यात आली. अध्यापकांना दिलेली प्रश्नावली परिशिष्ट "ब" मध्ये दिलेली आहे. या प्रश्नावलीत

एकूण एकवीस प्रश्न आहेत. त्यातील काही बंदिस्त स्वरूपाचे तर बरेचसे प्रश्न मुक्त व संमिश्र स्वरूपाचे आहेत. अध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणी क्रमांक ४.२ मध्ये केले आहे.

## सारणी क्रमांक ४.२

## अध्यापकांसाठी असलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण

| अ.नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १ | १ | बंदिस्त | मुलांचा व्यापक विचारात घेता इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर जाणून घेणे. |
| २ | २ ते ४ | संमिश्र | इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन समजून घेऊन पुस्तकाचे लेखन नव्या दृष्टीकोनातून झाले आहे काय आणि ही नवी उद्दिष्टे अध्यापनातून साध्या होतात का या बाबी जाणून घेणे. |
| ३ | ५ ते ७ | मुक्त | अध्यापनातील पाठ्यपुस्तकाचा वापर, परीक्षांचे स्वरूप आणि मार्गदर्शिकांचा वापर या गोष्टी जाणून घेणे. |
| ४ | ८ ते १० | संमिश्र | पाठ्यपुस्तकाचा अभ्यासासाठी वापर, मार्गदर्शक अधिक उपयुक्त होण्यामागील घटकांचा आढावा घेणे. |

| अ.नं | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरुप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| ५. | ११ ते १३ | मुक्त | परीक्षा आणि मार्गदर्शक यांचा संबंध, मार्गदर्शकातील काही ठळक बाबी आणि पाठ्यपुस्तकाचा वापर जास्त घेण्यासाठीचे प्रयत्न या विषयीचे उपक्रम, सुचना जाणून घेणे. |
| ६. | १४ | बंदिस्त | अध्यापकाने पालकाशी जवळीक साधली किंवा कसे हे जाणून घेणे. |
| ७. | १५, १६ | मुक्त | पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा, दोष जाणून घेणे, पाठ्यपुस्तकातून अभ्यास करतांना विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी जाणून घेणे. |
| ८. | १७ | संमिश्र | पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यातील उपयुक्त ठरविणा-या कारणांचा, घटकांचा शोध घेणे. |
| ९. | १८ | संमिश्र | "मार्गदर्शक वापरामागे परीक्षा पध्दतीचे स्वरुपच कारणिभूत आहे" या विधानाबाबतची मते जाणून घेणे. |
| १०. | १९ | संमिश्र | पाठ्यपुस्तक मार्गदर्शका सारखे असावे कां ? याबाबत सकारण मते जाणणे. |
| ११. | २०, २१ | मुक्त | पाठ्यपुस्तक लेखनातील बदल, पाठ्यपुस्तक अधिक वापरण्याबाबतचे उपक्रम व सूचना जाणून घेणे. |

ही अध्यापक प्रश्नावली परिशिष्ट "ब" मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली कराड शहरातील सर्वच्या सर्व म्हणजे सात माध्यमिक शाळातील इयत्ता दहावीला इतिहास विषय शिकविण्या-या सर्वच्या सर्व म्हणजे एकूण पंधरा अध्यापकांना देण्यात आली. सर्वच अध्यापकांनी प्रश्नावली भरून परत केली. प्रश्नावली भरून देणा-या अध्यापकांची यादी परिशिष्ट "ई" मध्ये दिलेली आहे.

प्रश्नावलीव्दारा अध्यापकांकडून गोळा केलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी संशोधकाने काही अनुभवी अध्यापकांशी चर्चा केली तसेच सर्वच माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकाशी याविषयी मोकळ्या वातावरणात चर्चा केली व त्यांची मते अजमावून घेतली.

४.१० पालक प्रश्नावली :-

इतिहास अध्ययन-अध्यापनात पाठ्यपुस्तक आणि मार्गदर्शक यांच्या वापरा विषयीचा पालकांचा दृष्टीकोन समजून घेण्यासाठी "पालक प्रश्नावली" तयार करण्यात आली. पालकांना दिलेली प्रश्नावली परिशिष्ट "क" मध्ये दिलेली आहे. या प्रश्नावलीत एकूण चौदा प्रश्न आहेत. यातील बरेचसे प्रश्न संमिश्र व मुक्त स्वरूपाचे होते. पालकाना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणी क्रमांक ४.३ मध्ये केले आहे.

सारणी क्रमांक ४.३

पालकांसाठी असलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण

| अ.नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १. | १ | मुक्त | पालकांची पाल्यांच्या अभ्यासाविषयीची कल्पना जाणून घेणे. |

| अ. नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरुप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|---|
| २ | २ | बंदिस्त | पाल्यांला नवी की जुनी पाठ्य-पुस्तके घेवून देतात ही बाब जाणून घेणे. |
| ३ | ३ | बंदिस्त | पालकाजवळ पाल्य मार्गदर्शक घेण्याचा आग्रह करतो किंवा नाही हे समजून घेणे. |
| ४ | ४ | बंदिस्त | पाल्याला अभ्यासाठी हवे ते पुरविण्याचा पालकाचा दृष्टीकोन जाणून घेणे. |
| ५ | ५ | संमिश्र | मार्गदर्शक वापरण्यामागे "पास होणे" हा दृष्टीकोन जोपासण्याची कारणे जाणून घेणे. |
| ६ | ६ | बंदिस्त | दहावीचे इतिहासाचे पाठ्यपुस्तक पालकाने पाहिले, वाचले का ? हे अजमावणे. |
| ७ | ७ | बंदिस्त | पाठ्यपुस्तक आणि अभ्यास पध्दती याविषयीचा दृष्टीकोन समजावून घेणे |
| ८ | ८, ९, १० | मुक्त | मार्गदर्शक वापरामागील कारणांचा शोध घेणे, पाठपुस्तक व मार्गदर्शक यातील फरकाचे स्वरुप जाणून घेणे, परीक्षा पध्दती व मार्गदर्शक यांचा संबंध जाणून घेणे. |
| ९ | ११, १२ | संमिश्र | पाठ्यपुस्तक लेखनातील दोष, उणीवा जाणून घेणे, पाठ्यपुस्तक मार्गदर्शका-सारखे असावे का ? याविषयी प्रांजळमते अजमावणे. |

| अ. नं. | प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
| --- | --- | --- | --- |
| १० | १३, १४ | मुक्त | पाठ्यपुस्तक लेखनातील बदल, पाठ्यपुस्तक अधिक वापरण्यासाठीचे उपक्रम व सूचना जाणून घेणे. |

---

ही "पालक प्रश्नावली" परिशिष्ट "क" मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली कराड शहरातील सर्वच्या सर्व म्हणजे सात माध्यमिक शाळात शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या एकूण फक्त पन्नास पालकांना ही प्रश्नावली दिली. पालकांमध्ये भिन्न आर्थिक स्तर- गरीब, मध्यम, श्रीमंत तसेच पदवीधर, डॉक्टर, वकील, शेतकरी, कष्टकरी, हमाल, व्यापारी वाहक, चालक, नोकरदार इत्यादी स्तरातील पालकांची निवड केली आहे. सर्वच पन्नास पालकांनी प्रश्नावली भरून दिली. जे निरक्षर पालक आहेत त्यांची मते प्रश्नाच्या अनुरोधाने मुलाखत घेऊन संशोधकाने नोंदवून घेतली. प्रश्नावली भरून देणाऱ्या पालकांची यादी परिशिष्ट "प" मध्ये दिलेली आहे.

प्रश्नावली व्दारा पालकांकडून गोळा केलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी संशोधकाने अन्य काही पालकांशी चर्चा केली, व त्यांची प्रस्तुत समस्येबाबतची मते जाणून घेतली.

## ४.११ समारोप :-

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या सर्वेक्षण पध्दतीचे स्वरूप, हेतु, तंत्रे आणि महत्व यांची चर्चा केली आहे. शिवाय संशोधनासाठी आवश्यक त्या साधन सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी

संशोधन साधन म्हणून मोठ्या प्रमाणात वापरलेल्या विद्यार्थी, अध्यापक, पालक प्रश्नावलीचा विश्लेषणात्मक उहापोह केला आहे.

या संशोधन साधनाच्या आधारे गोळा केलेल्या साधनसामुग्रीचे वर्गीकरण व विश्लेषण पुढील प्रकरण पांच मध्ये केलेले आहे.

=-=-=-=-=-=-=-=